अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय, ९१
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०० ०३०
दुरध्वनी क्र. २४९२१२१२, २४९२२६१८
E-mail addlcpacbmumbai@mahapolice,gov.in
दिनांक :- २५/११/२०२५

-: प्रेसनोट :-

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.र.क्र | ३७/२०२५ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | दिलीप शंकर सरवदे, ५७ वर्षे, पद- स्वच्छता निरीक्षक(आरोग्य विभाग), आर/उत्तर वॉर्ड, बी.एम.सी. रूस्तमजी शाळे शेजारी, दहिसर पुर्व, मुंबई ६८ |
| लाचेची मागणी | रूपये ३०,०००/- तडजोडीअंती रू. २०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रुपये २०,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये २०,०००/- |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे दहिसर पुर्व येथे भोजनालय आहे. दिनांक १०/११/२०२५ रोजी लोकसेवक दिलीप शंकर सरवदे यांनी तक्रारदार यांना फुड लायसन्स नसल्याबाबत नोटीस देवून त्यांचे दुकानावर कारवाई केली. नमूद कारवाई अंतर्गत लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे दुकानातील सामान जप्त करून घेवून गेले. दिनांक २०/११/२०२५ रोजी सदरहू सामान सोडविण्यासाठी तक्रारदार यांनी आर/उत्तर वॉर्ड याठिकाणी जावून लोकसेवक दिलीप शंकर सदरवदे यांची भेट घेतली असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे नोटीस न देण्याकरीता व यापुढे दुकानावर कारवाई न करण्याकरीता वार्षिक हप्ता म्हणून रू. ३०,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २१/११/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.<br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/११/२०२५ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांना नोटीस न देण्याकरीता व दुकानावर कारवाई न करण्याकरीता तडजोडीअंती वार्षिक हप्ता म्हणून रू. २०,०००/- लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक २४/११/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक दिलीप शंकर सरवदे, स्वच्छता निरीक्षक यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम रू. २०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन त्यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**सापळा अधिकारी :- श्रीमती दिपीका डंगारणे, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी:- श्री. चंद्रकांत माळी, सहाय्यक पोलीस आयुक्त**

मार्गदर्शक अधिकारी- श्री. संदिप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

२५/११/२५

( अनिल घेरडीकर )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर कोणत्याही लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
**टोलफ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८**
**व्हॉट्सअप क्र. :- 8828241064** **मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net**
**वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, acbwebmail@mahapolice.gov.in**
**ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**
**फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB**